MHAH170035782024

**नियमित दिवाणी दावा क्र.६२५/२०२४**

श्री. साईबाबा संस्थान

विरूद्ध

गौतम खट्टर व इतर

**निशाणी क्र.१६/१ वरील आदेश**

प्रस्तुत अर्ज वादींनी प्रतिवादीं विरुद्ध तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याकरिता दिलेला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात येणेप्रमाणे–**

२. वादी ही विश्वस्त संस्था असुन श्री. साईबाबा यांच्या विरुद्ध यु टयुब चॅनलवर प्रतिवादी यांनी आक्षेपार्ह विधान व वक्तव्य केले असल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर दिनांक ३०.१२.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ याने वादीतर्फे देण्यात आलेल्या नोटीसला प्रतिउत्तर दिल्यानुसार कोणतीही माफी मागीतली नसुन त्यांनी सोशल मिडीयावर अपलोड केलेले व्हीडीओ देखील काढुन घेतलेले नाही. सन २०२३ साली प्रतिवादी क्र.१ याने त्याने दिलेल्या मुलाखतीमध्ये श्री. साईबाबा बाबत खोटे, निराधार आणि अश्लील विधाने केली होती आणि सदर मुलाखत ही मोठया संख्येने लोकांनी पाहिली आहे. सदर विधाने आणि कृती ही अवमान व बदनामी तसेच निंदा करण्याच्या हेतुने करण्यात आलेली आहे. त्याबाबतचे सर्व चित्रीकरण हे नि.'अ' लिफाफ्यात पेन ड्राईव्हमध्ये दाव्यासोबत दाखल केले आहेत. प्रतिवादी क्र.१ यास पाहुणा वक्ता म्हणुन बोलावलेल्या एका कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीत देखील त्यांनी श्री. साईबाबा यांचे बाबत आक्षेपार्ह विधाने केली आहेत ज्याचा सखोल ऊहापोह वादपत्रात केला आहे. त्याच्या कथनानुसार साईबाबा हे लंपट, दारु पिणारे, दुराचारी, व्यभिचारी असे होते, वेद आणि भारतीय संस्कृती बाबत अनभिज्ञ होते. तसेच श्री. दाभोळकर यांनी साईबाबां बाबत लिहिलेल्या साई सद्चरित्र या पुजनीय ग्रंथाबाबत देखील अपमानास्पद विधान केली व उपरोक्त सर्व शब्द त्याचा भाग आहे. सदर प्रकारच्या मुलाखती आणि आक्षेपार्ह विधाने हे अनेक यु टयुब चनलवरती प्रसारीत होत आहेत. त्यामुळे दिनांक १३.०९.२०२४ रोजी श्री.

साईबाबा संस्थान यांनी प्रविवादी क्र.१ यांना तसे मेलद्वारे कळवले. ती विधाने व्हिडीओ काढुन घेण्याबाबत व जाहीर माफी मागावी अशी नोटीस दिली. त्याचप्रमाणे अशा प्रकारची अनेक वादात्मक विधाने त्यांनी श्री. साईबाबा विरुद्ध केलेली असुन त्याचे सखोल विश्लेषण त्यांच्या अर्जात परिच्छेद क्र.८, १०, १८अ ते फ, तसेच परिच्छेद क्र.२२ मध्ये नमुद केले आहे. परिच्छेद क्र.२२ मध्ये कथीत दावे काय आहेत व ते कसे खोटे आहेत याचा ऊहापोह केला आहे.

३. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी यांना ई मेल व रजिष्टर पोस्टाद्वारे दाव्याचे समन्स पाठविण्यात आले. जे त्यांच्यावर तामील झाले असल्याबाबतचे अहवाल प्रतिज्ञापत्रासह नि.२३ ते २५ लगत दाखल केले आहेत. वादीतर्फे दिनांक २७.०१.२०२५ रोजी युक्तिवाद चालु असतांना ॲड. श्री. अक्षय चांगले यांनी येऊन तोंडी सांगितले की, प्रतिवादींना न्यायालयाचे समन्स प्राप्त झाले असुन त्यांना हजर होण्याकामी मुदत हवी आहे परंतु त्यांना कोणतेही अधिकार पत्र व वकिलपत्र प्रतिवादींतर्फे दिले नाही. त्यांच्या विधानावरुन प्रतिवादींना दाव्याचे समन्स प्राप्त झाले आहे याबाबत वाद रहात नाही. त्यामुळेच प्रकरण हे आजपर्यंत तहकुब ठेवण्यात आले जेणेकरुन प्रतिवादींना हजर होण्याकामी वेळ मिळावा. परंतु आज सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत वारंवार प्रतिवादींना पुकारुनही त्यामध्ये कोणीही हजर झाले नाही. त्यामुळे प्रतिवादींचे म्हणणे न ऐकता, वादींची प्रस्तुत प्रकरणातील तातडी पाहता अर्ज विचारात घेतला आहे.

४. अर्ज व सोबत दाखल कागदपत्र आणि पेन ड्राईव्ह मधील चित्रफित यांचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे वादीतर्फे दाखल इंग्रजी व मराठी श्री. साई सच्चरित याचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी त्यांच्या मुलाखतीमध्ये श्री. साईबाबा यांच्या विरुद्ध उद्‌गारले की, लंपट, व्यसनी, दुराचारी, व्यभिचारी असे शब्द श्री. साई सच्चरित यामध्ये प्रथम दर्शनी कोठेही आढळ होत नाहीत. त्याचप्रमाणे साईबाबा हे कोणत्या जातीचे होते याबाबतही, त्याचप्रमाणे साईबाबा यांनी असे म्हटलेले की पवित्र गंगा जमुना नदी ही त्यांच्या पायातुन वाहते असे कोणते उदगार साई सच्चिरत मध्ये दिसुन येत नाही. उलटपक्षी श्री. साई चरित्र यातील अध्यायांचे अवलोकन करता दास गणु यांना साईबाबांच्या चरणी डोके टेकल्यानंतर त्यांच्या पायाच्या अंगठयामधुन गंगा

जमुनाचे स्त्रोत बाहेर येत असतांना दिसल्यानंतर त्या गोष्टीची प्रचिती झाली असे त्या ग्रंथामध्ये लिहिलेले आहे. तसेच साईबाबा यांनी कोणत्याही हनुमान मंदिर तोडले नसुन उलटपक्षी शनी, गणपती, शंकर, पार्वती आणि मारुती या मंदिराचे जिर्णोद्धार केला असल्याचा उल्लेख साई सच्चरित मध्ये आहे. त्यामुळे कोणत्या आधारावर प्रतिवादी श्री. साईबाबा विरुद्ध असे आक्षेपार्ह, निराधार विधान करत आहेत याचा बोध साई सच्चरित मधुन होत नाही.

५. त्याचप्रमाणे श्री. साईबाबा यांच्याकडे देव देवता किंवा महात्मा या नजरेने न पहाता व्यक्ती म्हणुन पाहिले, ज्या काळी शिर्डी येथे ते सन १८५४ साली आले त्यावेळी ते १६ वर्षांचे होते. झाँसी राज्य १८५३ साली काबीज करण्यात आले. साईबाबा त्यांनी ब्रिटीश सैन्याबरोबर कसे व कधी हात मिळवणी करुन झाँसी चे राज्य मिळवण्यास मदत केली व हे या प्रतिवादींना कसे कळाले याचा बोध होत नाही. सच्चरित मध्ये साईबाबा यांचे शिर्डी येथील आगमन १८५४ साली झाले त्यापुर्वी ते कोठे, कसे व कुणा सोबत रहात होते याबाबत कोठेही माहिती उपलब्ध नाही. ती माहिती प्रतिवादी यांना त्यांच्या जन्मापुर्वीची कशी मिळाली ही विचार करण्यासाठी भाग पाडणारी बाब आहे.

६. एखादया व्यक्ती बद्दल तुमचा जन्म झालेला नसतांना तिने काय कार्य, कथीत अपकार्य, केले याचा बोध कसा झाला हे देखील प्रतिवादी यांनी सांगणे गरजेचे होते असे वाटते. साईबाबा हयात असतांना वापरत असलेले टिन चे भांडे, बनवत असलेले जेवण याविषयी प्रतिवादी यांना कशी व कुठुन माहिती प्राप्त झाली हे पुराव्याअंतीच कळु शकेल. कोणाही व्यक्ति विरुद्ध इसविसन काळापुर्वीच्या घडलेल्या घडामोडी कोणत्या आधारावर २१ व्या शतकात प्रतिवादी करतात याचा खुलासा त्यांनी हजर होऊन देणे गरजेचे होते. जेव्हा की, साई सच्चरित श्री. दाभोळकर यांनी त्यांच्या हयातीत लिहिले आहे. साईबाबा ज्यावेळी शिर्डी येथे आले त्याकाळात श्री. दाभोळकर शिर्डी येथे स्थाईक होते व त्यांना आलेले अनुभव त्यांनी साई सच्चरित मध्ये नमुद केले आहे. त्यामुळे त्यांच्या कथनास भारतीय पुरावा कायदा नुसार गृहितक आहे.

७. साईबाबा यांना आज भारतातच नाही तर भारता बाहेरील भाविक पुजतात. त्यांची श्रद्धा त्यांच्यावर आहे असे विधान व मुलाखत प्रतिवादी यांनी जारी ठेवल्यास भविकांच्या आस्था व भावना या दोन्ही दुखावल्या जात आहेत व राहतील. प्रतिवादींनी केलेले विधान यास कोणता आधार आहे हे ते पुराव्याअंतीच सिद्ध करु शकतात. परंतु तो पर्यंत अशी आक्षेपार्ह विधाने करुन श्री. साईबाबां बाबत अपप्रचार करणे योग्य होणार नाही असे प्रथम दर्शनी दिसुन येते. सदर कृत्यामुळे श्री. साई बाबा संस्थान यांचे अपरिमित नुकसान होऊन साईबाबा यांच्या चारित्र्यावर अपविधाने करुन असंख्य भाविकांच्या भावना दुखावल्या जाणार आहेत. त्यामुळे पुढील आदेशापर्यंत वादी मागु पाहत असलेली अंतरिम तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी मान्य करणे मला योग्य वाटते.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी स्वतः किंवा त्यांचे एजंट, हस्तक, नोकर किंवा कोणाही व्यक्तिमार्फत श्री. साईबाबां विषयी आक्षेपार्ह विधान व वक्तव्य, मुलाखत किंवा कोणत्याही प्रकारचे भाष्य अथवा मुलाखतद्वारे बदनामी करणारे वक्तव्य करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश देण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कोणत्याही प्रकारच्या श्री. साईबाबा यांच्या विषयीच्या मुलाखतीत स्वतःच्या किंवा इतर चॅनल तसेच प्रसार माध्यमांद्वारे सामील होऊ नये.

४. खर्च ज्याचा त्याने सोसावा.

ADITI RATANKUMAR NAGORI
Digitally signed by ADITI RATANKUMAR NAGORI
Date: 2025.02.01 10:52:55 +0530

राहाता.
दिनांक – ३१.०१.२०२५.

(अदिती आर. नागोरी)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
राहाता.